**दोन मजली घर भाडयाने देणे आहे**

शिवगंगानगर भाग २, गोविंदश्री मंगलकार्यालयाजवळ, (Block No - 124 ). तळमजल्यावर - 1 BHK, पहिला मजला- एक रूम, टॉयलेट, बाथरूम, गच्ची. वैशिष्टे - नवीन colour केलेले, Compound, security Gate etc. KLE/ IMS शाळा, डि मार्ट जवळ.

संपर्क- दयानंद माशाळकर. 9423331752.
सदानंद माशाळकर 9924148970
भाडे- 12000 डिपॉझिट- 25,000.
एजंट, ब्रोकर यांनी संपर्क करु नये.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय**

फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय

**श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट**
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १५५ वा | मंगळवार, दि. २१ जानेवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



**हुरडा पार्टी**

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११

**वाडा भाड्याने देणे आहे**

बस स्थानकापासून जवळ आणि पोस्ट ऑफिससमोरील मध्यवर्ती ठिकाणी असलेला करजगी ता. अक्कलकोट या गावातील 5 हजार स्वे. फूट बांधकाम असलेला जुना वाडा तळघरासाहित भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, वैद्यकीय व्यवसाय आणि शासकीय कार्यालयासाठी बहुउपयोगी.

अधिक माहितीसाठी संपर्क: 9975434591


# महाराष्ट्रात राजकीय भूकंपाचे संकेत! शिंदेंना संपवून शिवसेनेत नवा 'उदय'?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महायुती सरकारने पालकमंत्री पदाची यादी जाहीर केल्यानंतर महायुतीत धुसफूस सुरु झाल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात आहे. याचं कारण म्हणजे महायुतीमधील काही मंत्र्यांना पालकमंत्री पदाच्या यादीतून डावलण्यात आलं. यामध्ये शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा मंत्री भरत गोगावले आणि मंत्री दादा भुसे यांचा समावेश आहे. भरत गोगावले यांनी आपली नाराजीही बोलून दाखवली. यानंतर अखेर रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्याचा निर्णय सरकारने घेतला.

यातच उदय सामंत यांच्याबाबत काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार आणि शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी केलेल्या एका दाव्यामुळे चर्चांना उधाण आलं आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात येत्या काळात आणखी एका नव्या राजकीय भूकंपाचे संकेत मविआच्या नेत्यांच्या वक्तव्यातून मिळाले आहेत. 'एकनाथ शिंदेंना संपवून उद्या नवा 'उदय' पुढे येईल' असं वक्तव्य काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलं.

उद्धव ठाकरेंना संपवून शिंदेंना आणलं, 'एकनाथ शिंदे, अजित पवारांना दूर करण्याचे प्रयत्न' असं म्हणत वडेट्टीवारांनी भाजपवर गंभीर आरोप केला. भाजपला राज्यात एकहाती सत्ता पाहिजे असं म्हणताना त्यांनी याची सुरुवात 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून' होणार असल्याचं म्हणत राजकीय वर्तुळाचं लक्ष वेधलं.



भाजपच्या याच भूमिकेवर ठाकरेंच्या शिवसेनेतील नेते संजय राऊत यांनीसुद्धा स्पष्ट प्रतिक्रिया देत राज्याच्या राजकारणातील सर्वात मोठा गौप्यस्फोट केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाकुंभ मेळ्यात जावं असा खोचक टोला त्यांनी लगावत, एकनाथ शिंदेंना बाजूला करून एक नवा 'उदय' समोर येईल असं स्पष्ट वक्तव्य केलं. उदय सामंत यांच्या डावोस दौऱ्यावरही राऊतांनी निशाणा साधला.

**काय म्हणाले राऊत?**

'एकनाथ शिंदेंना बाजूला करून एक नवा 'उदय' समोर येईल. माझ्या माहितीप्रमाणे उदय सामंत यांच्यासोबत 20 आमदार आहेत. ही माहिती माझी... 20 आमदार जेव्हा एकनाथ शिंदे सरकार स्थापन करताना रुसले होते तेव्हाच हा 'उदय' होणार होता किंबहुना तेव्हाच हा 'उदय' करण्याचं निश्चित झालं होतं. पण एकनाथ शिंदे सावध झाले आणि झाकली मूठ सव्वालाखाची... हे महाराष्ट्रातील सगळे पक्ष फोडतील. शिंदे गटही फोडतील, अजित पवार गटही फोडतील. फोडाफोडी हेच त्यांचं जीवन आणि राजकारण आहे', अशा शब्दांत त्यांनी भाजपवर कडाडून टीका केली.

**विजय वडेट्टीवार काय म्हणाले?**

'मराठीमध्ये एक म्हण आहे,'तुझं माझं जमेना आणि तुज्यावाचून करमेना' अशी काहीशी स्थिती महायुतीमध्ये पाहायला मिळत आहे. नाराजी दाखवून पुन्हा काहीतरी पदरात पडेल असा प्रयत्न दिसत आहे. एकनाथ शिंदे यांची स्थिती इतकी बिकट झाली आहे की त्यावर मी न बोललेलं बरं. त्यावर मी एखादा शब्द वापरला तर ते चुकीचं ठरेल. सध्याची महायुतीमधील स्थिती पाहता एकनाथ शिंदे यांची गरज संपली आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. एकनाथ शिंदे स्वतःहून बाजूला व्हावेत म्हणून त्यांच्या मित्रपक्षांकडून वेगवेगळे प्रयत्न होत आहेत का अशी भीती मला वाटत आहे. मी एक वक्तव्य करत आहे. ज्याप्रमाणे उद्धव ठाकरे यांना संपवून एकनाथ शिंदे यांना पुढे आणलं. त्याचप्रमाणे आता एकनाथ शिंदे यांना संपवून उद्या एक नवीन 'उदय' पुढे आणला जाईल. तो 'उदय' कुठला असेल ते मी सांगत नाही. मात्र त्याला पुढे आणण्याचा प्रयत्न होईल अशी स्थिती आपल्याला पाहायला मिळेल.'

**उदय सामंतांनी काय स्पष्टीकरण दिलं?**

खासदार संजय राऊत आणि विजय वडेट्टीवार यांच्या विधानानंतर उदय सामंत यांनी स्पष्टीकरण दिलं. ते म्हणाले की 'शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनी माझ्याबद्दल केलेलं वक्तव्य मी नुकतंच ऐकलं. त्यांचे वक्तव्य हा एक राजकीय बालिशपणा आहे.

माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जो उठाव केला, त्यात मी सामील होतो. त्यामुळेच मला दोनदा राज्याचे उद्योग मंत्रिपद मिळाले. याची मला पूर्ण जाणीव आहे. मला राजकीय जीवनात घडवण्यासाठी शिंदे यांनी केलेले प्रयत्न मी कधीही विसरू शकत नाही.'

# उजनीचे पाणी 10 फेब्रुवारीला बंद होणार! धरणात सध्या ८1 टक्के पाणी

**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** रब्बी पिकांसाठी ४ जानेवारीपासून उजनी धरणातून पाणी सोडण्यात आले असून यंदाच्या वषार्तील हे पहिले आवर्तन ३५ दिवस सुरू राहील. शेतीसाठी सोडलेले पाणी १० फेब्रुवारी रोजी बंद केले जाणार आहे. सध्या धरणात ४३.५० टीएमसी (८१ टक्के) पाणी आहे.



सोलापूर जिल्ह्यातील साडेचार लाख हेक्टरवर यंदा रब्बीची पेरणी झाली आहे. उजनीच्या पाण्याचा आधार दीड लाख हेक्टरला आहे. यंदाच्या पावसाळ्यात उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरले. १ ते १९ जानेवारीपर्यंत धरणातील पावणेआठ तर मागील अडीच महिन्यात साडेपंधरा टीएमसी पाणी कमी झाले आहे. सोलापूर शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी नुकतेच भीमा नदीतून साडेपाच टीएमसी पाणी सोडण्यात आले होते. त्यानंतर

(पान 2 वर..)

# सोलापूर बाजार समितीत कांद्याची आवक ५० टक्क्यांनी घटली; कसा मिळतोय दर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत यंदा कांद्याची आवक ५० टक्क्यांनी घटली आहे. एरव्ही ५०० ट्रक आवक असताना शनिवारी मात्र २५० ट्रक आवक झाली.आवक कमी असतानाही दर वाढत नसल्याने शेतकऱ्यांना फटका बसत आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत मागील वर्षी मकरसंक्रांतीपूर्वी आणि नंतर सरासरी ७०० ते ८०० ट्रक कांद्याची आवक होती.



यंदा डिसेंबरनंतर आवक वाढेल अशी आशा होती. मात्र, आवक वाढण्याऐवजी कमीकमी होत आहे. मकरसंक्रांतीच्या तीन दिवस सुट्टीनंतर आवक वाढेल, असा अंदाज होता.

मात्र, बुधवारी ९४ ट्रक, गुरुवारी ९२ ट्रक, शुक्रवारी १८५ ट्रक, शनिवारी २५० ट्रक आवक झाली. चार दिवसांमध्ये केवळ ६२१ ट्रक आवक झाली आहे. मागील वर्षी एका दिवसात एवढी आवक होती.परतीच्या पावसावेळी कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांकडील कांदा संपला आहे. शिवाय एकरी उत्पादनही कमी निघत आहे. त्यात दर पडल्यामुळे आर्थिक फटका बसत आहे.

उन्हाळी कांद्यावर भिस्त यंदा पाऊस चांगला झाल्याने आणि उजनीतून आवर्तन वेळेत सोडल्यामुळे उन्हाळी कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यात एकरुख योजनेला पाणी सोडल्यामुळे दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यात लागवड वाढल्याने पुढील महिन्यापासून उन्हाळी कांदा मार्केटमध्ये येणार असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

# 4 दिवसांचं ट्रेनिंग घेऊन झाला डॉक्टर, पंढरपुरात दहावी पास बहाद्दराने थाटला दवाखाना 3 वर्षापासून सुरू होता रुग्णांच्या जीवाशी खेळ

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर याठिकाणी एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इथं एका व्यक्तीने कसलंही वैद्यकीय शिक्षण न घेता चक्क दवाखाना थाटला होता. मागील तीन वर्षापासून हा आरोपी रुग्णांवर उपचार करत होता.

धक्कादायक बाब म्हणजे आरोपी मधुमेह, हाडांच्या समस्यांसह विविध गंभीर आजारांवर उपचार करत होता. त्याच्याकडे येणाऱ्या रुग्णांकडून हजारो रुपये उकळत होता. पण संशय आल्यानंतर आरोपीचं बिंग फुटलं आहे. आरोपीनं केवळ चार दिवसांचं ट्रेनिंग घेऊन हा दवाखाना सुरू केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

दत्तात्रय सदाशिव पवार असं आरोपीचं नाव आहे. तो मूळचा जालना येथील रहिवासी असून मागील तीन वर्षापासून तो पंढरपूर आणि शेगाव याठिकाणी रुग्णांवर उपचार करण्याचं काम करत होता. पंढरपूर शहरातील जुना अकलूज रस्ता येथील चंद्रभागा बस स्थानकामागे नारायण देव बाबा भक्तनिवास येथे आरोपीनं दवाखाना सुरू केला होता. पण परिसरातील काही लोकांना या आरोपीच्या बोगसगिरीवर संशय आला. यानंतर त्यांनी याबाबतची माहिती आरोग्य विभागाला कळवली.

दहावी पास असलेला बाबा रुग्णांवर उपचार करत असल्याची तक्रार मिळाल्यानंतर आरोग्य विभागानं पोलीस आणि महापालिका प्रशासनाची मदत घेत आरोपीच्या दवाखान्यावर छापा टाकला. यावेळी आरोपी दत्तात्रय पवार हा रुग्णालयात मधुमेह आणि हाडांशी संबंधित रुग्णांवर उपचार करत असल्याचं समोर आहे. आरोग्य विभागानं आरोपीकडे अधिकची चौकशी केली असता दवाखाना चालवण्यासाठी आवश्यक असलेलं कसलंही वैद्यकीय सर्टीफिकेट आरोपीकडे नसल्याचं समोर आलं आहे. आरोपी केवळ दहावी पास असून त्याने दवाखाना सुरू करण्यापूर्वा सातारा इथं चार दिवसांचं ट्रेनिंग घेतलं होतं.

याच गुणवत्तेच्या आधारावर त्याने पंढरपुरात दवाखाना थाटला होता. मागच्या तीन वर्षापासून तो याठिकाणी रुग्णांवर उपचार करत होता. प्रत्येक रुग्णांकडून तो ५०० रुपये फी आकारत होता, दिवसाला ७० ते ८० रुग्णांवर तो उपचार करत होता. आरोपी पंढरपूरसह शेगाव याठिकाणी देखील उपचार करण्यासाठी जात होता.




याप्रकरणी पोलिसांनी आरोपीवर कारवाई केली असून त्याचा दवाखाना बंद केला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.







## संपादकीय

# महायुतीची रणनीती

विधानसभा निवडणुकीतील धक्कादायक पराभवानंतर एकीकडे महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये कुरबुरी आणि वाद सुरू असताना आणि जाणीवपूर्वक स्वबळाची भाषा बोलली जात असतानाच दुसरीकडे सत्ताधारी महायुतीतील घटक पक्षांनी मात्र आपापल्या पातळीवर आपल्या पक्षाची वाटचाल मजबूत करण्याकडे लक्ष केंद्रित केलेले दिसते. महायुतीतील प्रमुख घटक पक्ष असलेल्या भाजपाचे राज्य अधिवेशन गेल्या आठवड्यात शिर्डी येथे पार पडले. त्यानंतर दोनच दिवसांनी अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिवेशनही शिर्डी येथेच झाले. महायुतीतील तिसरा घटक पक्ष असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेनेसुद्धा पुढील आठवड्यापासून राज्यभर आभार प्रदर्शन दौरा काढण्याचे नियोजन केले आहे. म्हणजेच महायुतीमध्ये राहूनसुद्धा आपापला पक्ष वाढवण्यासाठी या पक्षांनी आपली वाटचाल चालू ठेवली आहे. त्या दिशेने रणनीती आखण्यास प्रारंभ केला आहे. भाजपाने शिर्डी येथे झालेल्या अधिवेशनामध्ये स्पष्टपणे शतप्रतिशत भाजपाचा नारा पुन्हा एकदा दिला. कोणत्याही पक्षाची मदत न घेता भाजपाला स्वबळावर सरकार हवे आहे हे लपून राहिलेले नाही. अमित शहा यांनी यापूर्वीही अनेकवेळा बोलून दाखवले आहे. शिर्डी येथील अधिवेशनामध्येही अमित शहा यांनी स्पष्टपणे तसेच संकेत दिले. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जे अधिवेशन झाले त्या अधिवेशनाचे नामकरण 'अजित पर्व' असे करण्यात आले. अधिवेशनाला छगन भुजबळ जरी उपस्थित असले तरी त्यांनी स्पष्टपणे अजित पवार यांच्यावर टीका करून आपली नाराजीही प्रदर्शित केली. राष्ट्रवादी काँग्रेसची आगामी वाटचाल जर 'अजित पर्व' या नावाखाली होणार असेल तर यापुढे या पक्षामध्ये कोणतीही चर्चा होणार नाही आणि चर्चा न करताच निर्णय होणार असे संकेत मिळत असल्याचे छगन भुजबळ यांनी स्पष्टपणे म्हटले. अर्थात, भुजबळ या अधिवेशनाला उपस्थित राहिले हेच पक्षासाठी महत्त्वाचे. एकनाथ शिंदे यांनी आगामी आठवड्यापासून जो राज्यव्यापी आभार प्रदर्शन दौरा सुरू करण्याचे नियोजन केले आहे त्यामागे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे संघटन अधिक कमजोर करणे हाच एकमेव हेतू आहे. दीड महिन्याच्या कालावधीमध्ये संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढून ठिकठिकाणी शिवसेनेच्या शाखा पातळीवरील संघटन मजबूत करणे याच एका हेतूने एकनाथ शिंदे यांनी या आभार दौऱ्याचे नियोजन केले आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर काँग्रेस किंवा शरद पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी किंवा उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना यांनी या पराभावातून सावरून नव्याने पक्ष संघटनेची उभारणी करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे नियोजन केले नसतानाच विजय मिळाल्यानंतरही महायुतीतील घटक पक्षांनी ज्या प्रकारे वाटचाल चालू ठेवली आहे त्याचा विचार आता महाविकास आघाडीलाही करावा लागणार आहे. विधानसभा निवडणुकीत जरी चांगले यश मिळाले असले तरी जोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये तसेच यश मिळत नाही तोपर्यंत तळागाळातील मतदारांपर्यंत पोहोचता येणार नाही. याची जाणीव असल्याने महायुतीच्या घटक पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका समोर ठेवूनच आपली ही वाटचाल सुरू केली आहे. भाजपासाठी राज्यामध्ये काँग्रेस किंवा शरद पवारांचा राष्ट्रवादी किंवा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना यांच्याशीच लढाई असली तरी अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांना मात्र आपला पक्ष अधिक बळकट करण्यासाठी मूळ पक्ष संघटन कमजोर करण्याकडे जास्त लक्ष द्यावे लागणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून या सर्व घडामोडी केल्या जात आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात या सर्व पक्षांची आपापली पॉकेट्स आहेत. ही सर्व पॉकेट त्या त्या पक्षांसाठी कम्फर्ट झोन असली तरी इतर काही क्षेत्रांमध्येसुद्धा आपला प्रभाव वाढल्याशिवाय पक्ष अधिक मजबूत होणार नाही याची जाणीव असल्यानेच महायुतीच्या घटक पक्षांनी ही वाटचाल सुरू ठेवली आहे. भाजपाने पश्चिम महाराष्ट्रामध्ये आपली मुळे बळकट करण्यास प्रारंभ केला आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना विदर्भ आणि मराठवाडा या प्रदेशांमध्ये आपल्या पक्षाचा प्रभाव वाढण्याचे आव्हान पेलावे लागणार. राष्ट्रवादी काँग्रेसचे 'अजित पर्व'च्या माध्यमातून झालेले नियोजन असो किंवा एकनाथ शिंदे यांचा राज्यव्यापी आभार दौरा असो त्यामागे इतर क्षेत्रांमध्ये आपल्या पक्षाचा प्रभाव वाढवणे हा हेतू आहे. लोकसभा निवडणुकीतील विजयानंतर महाविकास आघाडीचे घटक पक्ष शिथिल राहिले आणि त्याचा फटका त्यांना विधानसभा निवडणुकीत बसला.

साहजिकच विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर अशा प्रकारचे शैथिल्य दाखवण्याची चूक करण्याची तयारी महायुतीच्या घटक पक्षांची नाही हेच यावरून सिद्ध होते. संपूर्ण नियोजनबद्ध पद्धतीने मैदानात उतरले तरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचेही मैदान मारता येईल, याची जाणीव महायुतीला असल्याने हे सर्व नियोजन केले जात आहे. एखादी निवडणूक असो अथवा नसो नेहमी निवडणुकीच्याच मोडमध्ये राहणाऱ्या भाजपाकडून आता इतर पक्षांनीही धडा घेतला असल्याने अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही आपापले पक्ष बळकट करण्याकडे लक्ष दिले आहे. महाविकास आघाडीचे घटक पक्ष या रणनीतीला कशा प्रकारचे उत्तर देतात हे आता पहावे लागणार आहे. त्याचे पहिले पाऊल म्हणून महाविकास आघाडीला आपल्यातले मतभेद प्राधान्याने संपवावे लागणार आहेत. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या विक्रमी विजयानंतरही महायुती अलर्ट मोडवर आहे याची दखल महाविकास आघाडीला घ्यावीच लागणार आहे.

पान १ वरून

# उजनीचे पाणी १० फेब्रुवारीला...

आता शेतीसाठी रब्बी हंगामातील पहिले आवर्तन सोडले आहे.

सोलापूर-उजनी समांतर जलवाहिनीचे काम अजून पूर्ण झाले नसून ती जलवाहिनी कार्यान्वित होण्यासाठी आणखी काही महिन्यांची वाट पहावी लागणार आहे. त्यामुळे आणखी एकदा भीमा नदीतून सोलापूर शहरासाठी पाणी सोडले जाईल. तर धरणातील पाणीसाठा उणे २० टक्के होईपर्यंत कालव्यामधून शेतीसाठी पाणी सोडता येते. उन्हाळ्यात मार्चअखेर व मे महिन्यात अशी दोन आवर्तने शेतीसाठी सोडावे लागतील, जेणेकरून शेतकऱ्यांना टंचाईच्या झळा बसणार नाहीत. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यतेखालील बैठकीत त्यादृष्टीने नियोजन झाले आहे.

धरणातून सध्या सोडलेले पाणी कालव्यामधून : २५०० क्युसेक बोगद्यातून : ३०० क्युसेक सीना-माढा उपसा सिंचन योजना : १६० क्युसेक दहिगाव उपसा सिंचन योजना : ८० क्युसेक

सोलापूर शहरासाठी आणखी एक आवर्तन सोलापूर ते उजनी या ११० किमी समांतर जलवाहिनीच्या कामाची मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत होती, तरीदेखील काम पूर्ण होण्यासाठी फेब्रुवारी उजाडणार आहे.टेंभुर्णी बायपासजवळील काम आता सुरू झाले आहे, पण वडाचीवाडी व देवडी जवळ राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळ (एनएचएआय) व शेतकऱ्याचा वाद न मिटल्याने महापालिकाच आता तेथील शेतकऱ्यांना मोबदला देऊन जलवाहिनीचे काम पूर्ण करणार आहे. काम पूर्ण झाल्यावर दोन-तीन महिने प्रात्यक्षिक (ट्रायल) होईल.त्यानंतर त्यातून सोलापूर शहरासाठी नियमित पाणी उपसा सुरू होईल.तोपर्यंत आणखी एकदा उजनीतून भीमा नदीद्वारे औज-चिंचपूर बंधाऱ्यात पाणी सोडावे लागणार आहे.

# चीनचा खोडसाळपणा

भारताचा शेजारी असणारा पण भारताला कायम पाण्यात पाहणारा चीन सतत काही ना काही खोड्या काढून दोन्ही देशातील तणाव कायम वाढवत असतो. हे आताच नाही तर १९६२ पासून चालू आहे. १९६२ साली भारताशी मैत्रीचा हात पुढे करून हिंदी चिनी भाई भाई म्हणत त्याने भारताचा केसाने गळा कापला. त्यानंतरही त्याने भारताच्या सतत खोड्या काढून भारताला त्रास दिला. कधी त्याने भारतात घुसखोरी केली तर कधी त्याने सीमेवर नवीन गावे वसवली तर कधी भारतातील गावांना चिनी नावे देऊन ती गावे चीनच्या हद्दीत असल्याचा दावा केला अर्थात चीनच्या या दाव्याला किंवा खोडसाळपणाला भारताने कधी भीक घातली नाही तरीही त्यांचा खोडसाळपणा कमी झाला नाही उलट वाढतच गेला. मागील वर्षी चीनने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनच्या नकाशात दाखवले होते. या नकाशात त्याने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनमध्ये दाखवले इतकेच नाही तर त्या गावांना चिनी नावे देखील दिली होती. चीनच्या या खोडसाळपणाची भारताने तातडीने दखल घेऊन त्याचा निषेध केला होता. भारताच्या निषेधानंतरही चीन भारताच्या खोड्या बंद करत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे यावेळी चीनने भारताच्या लडाखमध्ये दोन नव्या काऊंट्याची घोषणा करत घुसखोरी केली. पंधरा दिवसापूर्वीच भारताच्या हे लक्षात आले भारतीय लष्कराने आणि परराष्ट्र मंत्रालयाने याचा चीनला जाब विचारला आहे. चीन एवढ्या वरच थांबला नसून चीनने आता भारताशी वॉटर वार सुरू केले असून चीनने ब्रह्मपुत्रा नदीवर मोठा जल प्रकल्प सुरू केला आहे या जल प्रकल्पामुळे भारताला भविष्यात मोठ्या जल संकटाला सामोरे जावे लागणार आहे . दुसऱ्यांच्या खोड्या काढून गंमत पाहण्याची चीनची जुनी खोड आहे. अशी खोड तो फक्त भारताचीच काढतो असे नाही तर इतर देशांचीही काढतो मात्र आशिया खंडातील विशेषतः भारताच्या शेजारील काही देशांना त्याने वारेमाप कर्ज देऊन तर काही देशांना धाक दाखवून गप्प बसवले आहे. भारत मात्र त्याच्या या खेळीला बळी पडत नाही म्हणूनच तो अशा खोड्या अधून मधून काढत असतो. भारताच्या अरुणाचल प्रदेश आणि लडाखवर चीनचा डोळा आहे इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हा आपलाच भूभाग असल्याचा दावा चीनने अनेकदा केला आहे. मागील वर्षी चीनच्या झाऊझंग येथे पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत भारताने खेळण्यास नकार दिला त्यावेळी चीनने अरुणाचल प्रदेशातील खेळाडूंना स्टेपल व्हिसा दिला होता. स्टेपल व्हिसा देऊन त्यांनी एकप्रकारे भारताला डिवचले होते. त्या आधी लडाखमध्ये चिनी सैन्य घुसवले होते तेंव्हा दोन्ही देशातील सैन्य एकमेकांपुढे उभे ठाकले होते केंव्हाही युद्धास तोंड फुटेल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी झालेल्या धुमश्चक्री नंतर चिनी सैन्य भारताच्या हद्दीतून निघून गेले होते. मात्र सीमेवर त्यांच्या हालचाली कायम चालू असतात. मुळात चीन हा जगातला सर्वात कपटी देश आहे. चीनला जगातील महासत्ता व्हायचं आहे त्यासाठी त्याने विस्तारवादी भूमिका स्वीकारली आहे त्यामुळेच तो शेजारील देशांची जमीन आणि मालमत्ता बळकावीत आहे. त्यांच्या या विस्तारवादी धोरणाला जर कोणी आडकाठी आणणार असेल तर तो भारत आहे हे चीन जाणून आहे म्हणूनच तो भारताच्या अशा अधूनमधून खोड्या काढून भारताला त्रास देत असतो अर्थात त्याच्या या खोड्यांना भारत आता बधणार नाही कारण आजचा भारत हा १९६२ चा भारत नसून २०२५ चा भारत आहे. चीनच्या आरे ला कारे करण्याची हिंमत या भारतात आहे त्यामुळेच भारताशी थेट पंगा न घेता अशा छोट्या मोठ्या खोड्या काढून भारताला त्रास देण्याचे धोरण चीनने अवलंबले आहे.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# मागील ३ महिन्यांपासून अजित पवार गटाचे सोलापूर जिल्हाअध्यक्ष पद रिक्त अवस्थेत

**माढा (कटूसत्य वृत्त):-** मागील ३ महिन्यांपासून राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार पक्षाचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष पद रिक्त अवस्थेतच आहे. सोलापूर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी असलेल्या दिपक साळुंखे यांनी ऐनवेळेस अजित पवारांची साथ सोडलेली होती.तेव्हा पासुन आजतागायत पक्षाला जिल्हाध्यक्षच मिळेना झाला आहे.जिल्हाध्यक्षपदासाठी काम करण्यासाठी इच्छुक असलेल्या पैकी ग्रामीण भागातील चेहरा म्हणुन मोडनिंब च्या उदय माने यांचे नाव जिल्हाध्यक्ष पदासाठी सर्वाधिक आघाडीवर असल्याची माहिती समोर आलेली आहे.तसेच उत्तर सोलापूर तालुक्यातील अविनाश मार्तंडे या दोघांचीही नावे समोर आलेली असतानाच जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीची प्रक्रिया का रखडली आहे ? उपमुख्यमंत्री अजित पवार निवडीसाठी कश्याची प्रतिक्षा करताहेत हे देखील पहावं लागणार आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या वेळेस सोलापूर जिल्हाअध्यक्ष पदावर असलेल्या दिपक साळुंखे पाटील यांनी अचानक अजित पवारांना दगाफटका देत पक्षाला राम राम ठोकला.शिवसेनेच्या ठाकरे गटात जाऊन सांगोल्याचे मशालीचे तिकीट देखील मिळवले.मात्र निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. दिपक साळुंखे पाठोपाठ प्रदेश प्रवक्ते पदावर असलेल्या उमेश पाटील यांनी ही पक्षाला रामराम ठोकला होता.हे दोन्ही नेते पक्षाला सोडचिठ्ठी देऊन गेल्यापासून जवळपास ३ महिन्याच्या कालावधीनंतर ही अजित पवार गटाचे सोलापूरचे जिल्हाअध्यक्ष पद रिक्त अवस्थेतच आहे.त्यामुळे जिल्हाध्यक्ष पदाची माळ पक्ष वाढीच्या दृष्टीने नव्या ग्रामीण भागातील इच्छुकाच्या गळ्यात पडणार का ? हे पहावं लागणार असुन सोलापूर जिल्हात अजित पवाराच्या पक्षाचा एकही आमदार नसल्याने ग्रामीण भागात पक्ष संघटन वाढवण्याच्या कामासाठी नव्या उमेदीचा चेहरा दिला तरच पक्षाला बळ मिळु शकेल.उदय माने उपमुख्यमंत्री अजित पवारांची तिन वेळा भेट घेऊन काम करण्यासाठी इच्छुक असल्याचे सांगुन आले आहेत.

जिल्हाध्यक्षपदासाठी कोण आहेत इच्छुक आणी काय आहे पार्श्वभुमी-

माढा तालुक्यातील मोडनिंब गावातील उदय माने हे जिल्हा अध्यक्ष पदासाठी इच्छुक आहेत. पक्षाच्या स्थापनेपासून क्रियाशील सदस्य अजित पवारांसोबत पक्षाचे काम करीत आले आहेत.राष्ट्रवादीचे युवक तालुका उपाध्यक्ष काम पाहिले आहे.पंचायत समिती सदस्य म्हणुन घड्याळ चिन्हावर निवडुन आलेत.उदयकिर्ती बॅंकेचे संस्थापक अध्यक्ष आहेत.पक्षासाठी तन मन धनाने काम करण्यासाठी माने इच्छुक आहेत. अविनाश मार्तंडे हे उत्तर सोलापूर तालुक्यातील असुन त्यांच्याकडे या पुर्वी शरद पवार गटाचे ओबिसी सेलचे जिल्हाध्यक्षपद होते.विधानसभा निवडणुकीवेळी ते अजित पवार गटात आले आहेत.इतर राजकीय पार्शवभुमी त्यांची काही नसुन ते जिल्हाध्यक्षपदासाठी चर्चेत आहेत.

माजी आमदार दिपक साळुंखेवर फसवणूकीचा गुन्हा तर संजय शिंदेची धडपड-माजी आमदार दिपक साळुंखे यांच्यावर ११ कोटीची फसवणुक केल्याचा गुन्हा दाखल झालेला आहे.त्यामुळे एकीकडे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी जनमानसात प्रतिमा मलिन झालेल्यांना आणी बंडखोरी केलेल्या नेत्यांना पक्षात स्थान नसल्याचे शिर्डी च्या शिबीरातुन स्पष्ट केले आहे.त्यामुळे साळुंखे यांना पुन्हा पक्षात स्थान मिळणार नसल्याचे निश्चित आहे.

तर दुसरीकडे करमाळा मतदार संघातुन घड्याळ चिन्ह न घेता अपक्ष निवडणुक लढविलेले संजय शिंदे देखील जिल्हा पद मिळवण्यासाठी धडपड करत असुन शिर्डी च्या शिबीराला उपस्थित राहिले असले तरी अजित पवारांनी देखील त्यांना कसलाही प्रतिसाद दिलेला नसल्याची माहिती समोर आलीय.

मी अनेक वषार्पासून अजित पवारांसोबत काम करीत आलो आहे. घड्याळ्याच्या चिन्हावरच मी पंचायत समितीचा सदस्य म्हणुन देखील निवडुन आलेलो आहे.पक्ष वाढीसाठी मला प्रामाणिक काम करण्याची इच्छा आहे.अजित दादा जी जबाबदारी देतील ती सक्षमपणे पार पाडणार

-उदय माने,राष्ट्रवादीचे नेते इच्छुक जिल्हाध्यक्षपदासाठी

मी शरद पवार गटातून अजित पवार गटात विधानसभा निवडणुकीवेळी प्रवेश केला.जिल्हाध्यक्ष पदाची पक्षाने संधी दिली तर ठिक नाही.नाही दिली तरी देखील मी पक्षात नाराज नसणार आहे.पक्षात काम करणार.मला पद मिळावंच असं काही नाही-

-अविनाश मातंर्डे, जिल्हाध्यक्ष इच्छुक

## प्रबोधन

# अति तेथे माती !

अति सर्वत्र वर्जयेत अर्थात, अती तेथे माती ह्या म्हणीचा भावार्थ बहुतेकांना माहीत असतो. पण प्रसिद्धीचं आकर्षण असं जबरदस्त असतं की, त्या नादात माणूस अविवेकी होऊन अतिरेकी झाला नाही, तरच नवल! एका संस्कृत सुभाषिताने अशा प्रसिद्धीलोलुप व्यक्ती कोणते उद्योग करतात, ते फार छान सांगितलं आहे.

घटं भिंद्यात्पटं छिंद्यात कुर्याद्रासभरोहणम ।
येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत ॥

अर्थात, मडकं फोडून, कपडे फाडून अथवा गाढवावर बसून म्हणजे काहीही करून काही लोक प्रसिद्धी मिळवतात. प्रसिद्धीमध्ये एक नशा असते. तिची चटक लागलेली व्यक्ती नादान होऊन प्रसिद्धी किंवा कीर्तीच्या मागे लागते.

म्हणूनच पाश्चात्त्य लेखक आयर्विंग म्हणतात, 'जो कीर्तीची अभिलाषा धरीत नाही तो सुखी असतो.' थोर तत्त्वज्ञानी सॉक्रेटिसच्या मतानुसार, 'थोर साहसकर्मांचा सुगंध म्हणजे कीर्ती!' असं जरी असलं तरी आयर्विंगच्या विचारानुसार, कीर्तिवेडे लोक दुःखभोगीच असतात. जग स्वतःच्या किंचित सुखासाठी, मनोरंजनासाठी माणसांच्यात ईर्ष्या निर्माण करते आणि कीतीर्साठी हापापलेले वेडे त्यापायी आपला जीव पणाला लावतात. पोरांचा खेळ होतो, बेडकांचा जीव जातो, असं वेगळ्या अथार्ने म्हणण्याची पाळी आपणावर येते.

शर्यती लावणे हा अगदी रानटी अवस्थेपासून माणसांच्या मनोरंजनाचा क्रीडाप्रकार आहे. बैलगाड्यांच्या शर्यती, सायकलींच्या शर्यती जीवघेण्या प्रकारातच समाविष्ट केल्या पाहिजेत. घाटांचा राजा ही पदवी विजेत्याला देण्यासाठी आयोजक आतुर असतात आणि ती प्राप्त करण्यासाठी अनेक तरुण मरणप्राय दमछाक सहन करीत, जीवतोड प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतात. विलासी रोमन लोक आपल्या करमणुकीसाठी कैद्यांवर वाघ, सिंह, हत्ती सोडत असत. आपण बैलांच्या पाठीवर फुटणाऱ्या काठ्या आणि मांडीला टोचल्या जाणाऱ्या पराण्या शर्यतीत पाहातो. रोमन संस्कृती मानवी शरीरातून उडणाऱ्या रक्ताच्या चिळकांड्या पाहून टाळ्या पिटीत आनंदाचा जल्लोष करीत असे. त्या प्रवृत्ती आणि घामाने निथळणारे 'घाटांचे राजे' पाहाण्यात आनंद मानणाऱ्या प्रवृत्ती यात तसा फारसा फरक नाहीच. सॉक्रेटिस सत्यनिष्ठ होते. साहसकमार्तून मिळणारी कीर्ती दुर्गंधमय असते, हे सत्य मात्र काळाच्या प्रभावामुळे त्यांना आकळलं नसावं. अशा साहसाद्वारे कीर्ती मिळवण्याचा प्रयत्न न करणारे आयर्विंगच्या मते, सुखी असतात हे नक्की! गिनेज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड हे माणसांना अप्रत्यक्षपणे छळणारं एक नोंदींचं पुस्तक आहे. आपलं नाव या पुस्तकात नोंदलं जावं म्हणून माणसांनी काय करायचं शिल्लक ठेवलं आहे? उदाहरणार्थ, मोठ्या आकाराचे भयंकर विषारी असे १०-१२ विंचू तोंडात ठेवणे, विषारी सर्पाच्या संगतीत अधिकाधिक तास राहाणे, दंश करणाऱ्या मधमाशा चेहऱ्यावर वागवणे, अळ्या-किडे यांच्या किळसवाण्या जास्तीत जास्त डिशेस कमीत कमी वेळात फस्त करणे, शंभरपर्यंत अंडी एकावेळी गट्ट करणे, अशा अनेक आचरट कृत्यात माणसं प्रसिद्धीसाठी, कीतीर्साठी सहभागी होऊन जिवाचे हालहाल करून घेताना दिसतात. गिनेजच्या विक्रमांच्या नोंदीच्या मागे जो विकृत मेंदू आहे, तो बहुतेक रोमन लोकांच्या जनुकांतून विकसित झाला असावा! ह्या विकृतींना जर आपण नवसंस्कृती म्हणत असू तर ती निषेधार्ह आहेच. घृणास्पद कृतींचा अतिरेक सभ्य आणि समंजस व्यक्तीला आवडत नाही. ह्यालाच माणूसपण म्हणतात.

भारतीय समाजातही कर्मकांडी अतिरेक धुमाकूळ माजवून माणसांचा विलक्षण छळ करीत असतो. लक्ष बिल्वदले वाहाणे, कोटी ॐ काराचा जप करणे, शतकोटी यज्ञाचा संकल्प करणे, छाती बडवणारं मातम करणे, शेकडो दिवस अन्नपाण्याशिवाय राहाणे, ही सर्व माणसांची दमछाक करणारी प्रकरणंच आहेत. लक्ष तुळसीदले वाहाणारी मूर्ख भक्त मंडळी पाहून श्रीकृष्णालाही त्यांची दया आली असावी. म्हणूनच गीतेत ते म्हणाले, पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्तः प्रयच्छते । अर्थात, माझी भक्ती एखादं पान वाहूनही करता येते. श्रीकृष्णाला समाजाचं स्वास्थ्य कोणत्याही कारणाने बिघडू नये, असंच वाटत असावं. मात्र आततायीपणा आणि अतिरेक हे समाजाचे स्वभावजन्य दुर्गुण आहेत. शहाण्याने या दुगुर्णांपासून लांब राहावं, हेच बरं. कारण-

प्रसिद्धीच्या मागे । कोणी लागूनिया
अति करुनिया । नष्ट होती ॥१
स्पर्धा, शर्यतीने। लाभणारे यश
शक्यतो कष्टास। कारण ते ॥२
मानवी शक्तीच्या । मयार्दा तोडणे
दुःखा प्राप्त होणे । दुजे काय? ॥३
अति तेथे माती। शहाणे म्हणती
मातीत लोळती। मात्र मूर्ख ४
संयम, विवेक । अंगी बाणवावा
तकार्ने जाणावा योग्य मार्ग ॥५
परहितासाठी। झटावे शथीर्ने
जीवनाचे सोने । त्याने होई ॥६
विद्याप्राप्तीसाठी । करा अतिरेक
समाजा सुरेख । रूप द्यावे ॥७
कौशल्याची प्राप्ती । करा अमर्याद
भरूनिया दाद । मिळे ऐसी ॥८
अतिरेक छान । कलानिर्मितीचा
स्वर्ग या जगाचा । करी तोच ॥९
कोठे हवे अति । कोठे नको अति
नीट समजती । तेच सुज्ञ ! ॥१०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# विजयवाडी येथे विविध विकास कामांचे उद्घाटन संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील मौजे विजयवाडी येथील ग्रामपंचायतीने आयोजित केलेल्या विविध विकास कामांचे उद्घाटन व रस्त्यांचे भूमिपूजन, अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, आ. उत्तमराव जानकर, माळशिरस पंचायत समितीचे उपसभापती अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या विकास कामामध्ये सकट वस्ती येथील सभामंडप आठ लाख रुपये कामाचे भूमिपूजन, लावंड वस्ती येथील सभा मंडप आठ लाख रुपये, भंडारे वस्ती ते सकट वस्ती रस्ता बावीस लाख रुपये, जलजीवन मिशन योजना ८२ लाख रुपये कामाचे लोकार्पण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, आ. रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



यावेळी माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील, माजी सभापती मच्छिंद्र ठवरे, माजी जिल्हा परिषद सदस्या सुनंदाताई फुले, सहकार महर्षी साखर कारखान्याचे संचालक भीमराव काळे, शंकरराव मोहिते पाटील सूतगिरणीचे चेअरमन सुभेदार काळे, केपी काळे, पांडुरंग वाघमोडे, बाळासाहेब तरसे, माजी सरपंच बाळासाहेब काळे, उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग माळशिरसच्या सौ. टी.एन. हुन्नुरे, वैद्यकीय अधिकारी डॉ.ए. बी. आव्हाड, गटनेते आप्पा इंगळे, सरपंच उमेश भंडारी, उपसरपंच रवींद्र इंगळे, माजी उपसरपंच शंकर वाघमोडे, पोलीस पाटील अनिल लावंड, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब इंगळे, प्रल्हाद लावंड, ग्रामसेविकास मनिषा साठे विजयवाडी व पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

# आस्थापनांनी महिला तक्रार निवारण समिती गठित करावी

## जिल्हा महिला व बालविकास अधिका-यांचे आवाहन

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणुकीस प्रतिबंध कायद्यानुसार, सर्व शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक, खासगी आस्थापनेमध्ये महिला तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे. अशा आस्थापनांनी समितीचे गठन करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित वातावरण मिळण्यासाठी 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम 2013' शासनाने हा कायदा केला असून या कायद्याचे कलम 4(1) अन्वये प्रत्येक शासकीय, निमशासकीय कार्यालयीन तसेच खाजगी आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती गठीत करणे बंधनकारक आहे. जे कार्यालय आस्थापना अंतर्गत तक्रार समिती गठीत करणार नाही त्या आस्थापनेच्या कार्यालय प्रमुखास सदर अधिनियमाचे कलम 26(1) अन्वये 50 हजार रुपया पर्यंत दंड करण्याची तरतूद सदर अधिनियमात आहे. सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध मनाई व निवारण) अधिनियम 2013 या कायद्याचे कलम 4(1) प्रमाणे राज्य शासनास 31 जानेवारी 2025 पर्यंत सर्व शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी अस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समित्या स्थापन करणे बाबत आदेश दिले असून याबाबत फेब्रुवारी 2025 च्या पहिल्या आठवड्यात शासनास प्रतिज्ञा पत्र सादर करणे बाबतचे आदेशही दिले आहेत. जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी अस्थापनांनी त्यांच्या कार्यालयाची अंतर्गत तक्रार समिती गठीत केले बाबतच्या आदेशाची प्रत दिनांक 25 जानेवारी 2025 पर्यंत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, सी.एस.नं.1608/09, प्लॉट नं.12, पहिला मजला, शोभा नगर, सात रस्ता, बिग बझार च्या पाठीमागे सोलापूर. ई-मेल:- sol_dwcdo@yahoo.co.in या पत्त्यालवर पाठवावे . ज्या अस्थापनाच्या ठिकाणी समिती गठीत अशा कार्यालय, अस्थापना प्रमुखांच्या विरुद्ध कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम 2013 या अधिनियमाचे कलम 26(1) अन्वये कार्यवाही होऊ शकते. असेही जिल्हा महिला व बालविकास अधिकारी,सोलापूर यांनी कळविले आहे.

## वात्रटिका

### नाराज पालक

आधी कुजबूज झाली
नंतर झाली धुसफूस...
घडून जाते सगळे आणि
कोणालाच नसतो मागमूस...
निवडा निवडीच्या खेळात
जिल्ह्याचे पालक अडकले...
काही हसले,तर काहींच्या
स्थगितीला कारण जोडले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सर्व विभाग प्रमुखांनी सात सुत्री कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावी - जिल्हाधिकारी आशीर्वाद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 7 जानेवारी 2025 रोजी राज्यातील सर्व अधिकारी यांना 100 दिवस उद्दिष्टपूर्ती बाबत 7 सूत्री कार्यक्रम दिला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने लेखी सूचना यापूर्वीच निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी आपल्या अधिनिस्त कार्यालयात पुढील शंभर दिवसात या सात सुत्री कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित मुख्यमंत्री महोदयांच्या सात सुत्री कार्यक्रमाची शंभर दिवसात उद्दिष्ट कृतीच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी पोलीस उपायुक्त दिपाली काळे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रमेश काटकर, सोलापूर महापालिकेचे सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी सचिन कवळे, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका विना पवार, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी मुख्यमंत्री महोदयांनी 100 दिवसात उद्दिष्टपूर्तीच्या अनुषंगाने सर्व विभागांनी आपली वेबसाईट अद्यावत करणे, कार्यालय परिसर व कार्यालयाची स्वच्छता करणे, इज ऑफ लिविंग, कार्यालयात अभ्यागतासाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, जनतेच्या तक्रारीचा निपटारा वेळेत करणे, गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे व प्रत्येक अधिकाऱ्यांनी आठवड्यातून दोन दिवस फील्ड व्हिजिटवर जाणे अशा प्रकारची सात सुत्री दिलेली आहे. या सात सूत्री मधील प्रत्येक बाबीवर संबंधित विभाग प्रमुखांनी अत्यंत काटेकोरपणे कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने नियोजन करावे व हा सात सुत्री कार्यक्रम पुढील शंभर दिवसात यशस्वी होईल यासाठी योग्य अंमलबजावणी करावी असे निर्देश त्यांनी दिले. ज्या विभागांनी जिल्हास्तरावर स्वतः संकेतस्थळ निर्माण केलेले असेल तर ते अद्यावत करणे. ज्या विभागाचे संकेतस्थळ मुख्यालय स्तरावरून ऑपरेट केले जाते ते मुख्यालय स्तरावरून होईल परंतु आपल्या जिल्ह्याची माहिती त्यात अद्यावत आहे का याची खात्री संबंधित विभाग प्रमुखांनी घ्यावी. आपले संकेतस्थळ नागरिकांसाठी सहज व सुलभ समजेल अशा पद्धतीने असले पाहिजे याची खात्री करावी. सर्व विभागांनी आपला कार्यालय परिसर स्वच्छ राहील यासाठी प्रयत्न करावेत तसेच कार्यालयीन स्वच्छता मोहीम हाती घेऊन अभ्यागतांसाठी शौचालये व्यवस्थित असले पाहिजे, त्यात पाण्याची व्यवस्था असली पाहिजे, नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असली पाहिजे तसेच त्यांच्यासाठी बैठक व्यवस्था ही व्यवस्थित असली पाहिजे याची खात्री करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले.

कार्यालयातील अभिलेखे व्यवस्थित असले पाहिजेत यासाठी सिक्स बंडल सिस्टीम वापर करावा. या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाच्या वतीने याच आठवड्यात प्रत्येक कार्यालयातील तीन अधिकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. आपले सरकार पोर्टल वरील तसेच नागरिकांच्या अन्य तक्रारींचा निपटारा वेळेत झाला पाहिजे. प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी तक्रारीचा निपटारा व्यवस्थितपणे होत आहे का नाही याची खात्री स्वतः करावी. अभ्यांगताना भेटण्याचा दिवस व वेळ ठरवून घेऊन त्याचा फलक दर्शनी भागात लावावा. माहे फेब्रुवारी 2025 च्या लोकशाही दिनापासून प्रत्येक विभाग प्रमुखांनी लोकशाही दिनात आपली उपस्थिती लावून आलेल्या तक्रारींचा निपटारा करावा. गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती लवकरच गठित करण्यात येणार आहे. तसेच कार्यालय प्रमुखांनी आठवड्यातून दोन वेळा फिल्ड व्हिजिट करावी व त्याबाबतचे रेकॉर्ड ठेवावे अशी सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केली.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी मुख्यमंत्री महोदयांचा शंभर दिवसाच्या उद्दिष्ट पूर्तीच्या अनुषंगाने सात सुत्री कार्यक्रमाची अत्यंत सविस्तर माहिती देऊन प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी करावयाच्या कामकाजाची माहिती दिली. तसेच लोकसेवा हक्क अधिनियम, नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा, माहितीचा अधिकार, कार्यालयीन स्वच्छता, अभयागतांसाठी सोयी सुविधा, कामाच्या ठिकाणी लैंगिक शाळा प्रतिबंध अनुषंगाने समितीची स्थापना आदी बाबीची पूर्तता झाली आहे याबाबतचे प्रमाणपत्र प्रशासनाला 27 जानेवारी 2025 पर्यंत सादर करावेत, असेही त्यांनी सूचित केले.

# जिजामाता प्राथमिक शाळेत स्वच्छतागृहाचे लोकार्पण



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- प्राथमिक उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी येथील शाळेत बालाजी अमाइन्सच्या सहकायार्तून उभारण्यात आलेल्या स्वच्छतागृहाचे लोकार्पण बालाजी अमाइन्सचे तांत्रिक सल्लागार मल्लिनाथ बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले.तीनशे विद्याथीर्संख्या असलेल्या या शाळेत स्वच्छतागृहाअभावी विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याने मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलू यांनी शाळेत स्वच्छतागृह उभारण्याची मागणी बालाजी अमाइन्सकडे केली होती. त्यानुसार बालाजी अमाइन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी व संचालक मंडळाने स्वच्छतागृह बांधून दिले. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक उदय जाधव, विजयकुमार राजापुरे,ज्ञानेश्वर कदम, वनीता ग्राम,अपर्णा चव्हाण, शुभांगी पाटील,राजश्री ढवण, बालाजी अमाइन्सचे दत्तप्रसाद सांजेकर उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र.३६३/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. हनुमंत पाराप्पा गवळी रा. हिगणी(पा) ता. बार्शी जि सोलापूर (असल्यास, तर्फे वकीलइस्माईल चाँ तांबोळी) } अर्जदार

**विरूध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथाग्रामसेवक, ग्रा. पं.हिगणी (पा) } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील पाराप्पा शंभू गवळी, रा. हिगणी(पा) ता. बार्शी जि सोलापूर यांचा मौजे हिगणी (पा) ता. बार्शी राहत्या घरीया ठिकाणी दिनांक १५ ऑक्टोबर १९८४ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.तरी अर्जदाराचे वडील पाराप्पा शंभू गवळी यांचा दिनांक १५ ऑक्टोबर १९८४ रोजी मौजे हिगणी(पा) ता.बार्शी राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे.न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून दयावी.मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.आज ता.७ जानेवरी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

सही /-
**कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी**

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषत मोजे अरण व मौजे वरवडे, ता. माढा, जि. सोलापुर व परिसरातील लोकांना या सावधानतेची जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापुर सब डि व ता. माढा पैकी मोजे अरण येथील गट नं. ३७८/१/क, क्षेत्र १ हे ६५ आर आकार १ रु. १० पैसे यापैकी धनंजय महादेव मुंजाळ यांचे नांवे असलेले क्षेत्र हे ८१ आर, आकार ० रू. ५० पैसे व मौजे वरवडे येथील गट नं. २१३/१ यांसी क्षेत्र १ हे ३९, आकार १ रू. ५५ पैसे पैकी धनंजय महादेव मुंजाळ यांचे नांवे असलेले क्षेत्र १ हे १९ आर, आकार १ रू. ३३ पैसे येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत ही धनंजय महादेव मुंजाळ तसेच त्यांची पत्नी म्हणजेच आमचे अशील स्वाती धनंजय मुंजाळ, मुलगा- अविष्कार धनंजय मुंजाळ, नंदराज धनंजय मुंजाळ सर्व रा. सर्वे नं. ७८/१, समर्थ नगर, तन्नु शाळेजवळ, नवी सांगवी, पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे यांचे हिंदू एकत्र कुटूंबाचे मालकी कब्जेवहीवाटीची आहे. सदर मिळकतीतीत आमचे अशिलाचा कायदेशीर हक्क हिस्सा आहे. सदर मिळकतीचे अद्याप पावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. असे असताना सदर धनंजय महादेव मुंजाळ हे दारूचे व्यसनाचे अत्यंत आहारी, गेलेले असुन ते सदर व्यसनपुर्ततेकरीता आमचे अशिलाचे परस्पर, विनासंमती, विनामाहीती होवु देता, एकत्र कुटूंबास कोणतीही कायदेशीर गरज नसताना सदरची मिळकत त्रयस्त व्यक्तीस विक्री करण्याची भाषा केलेली आहे व तसे बेकायदेशीरपणे ते गि-हाईक शोधत आहेत याची खात्रीशीर माहीती आमचे अशिलास झालेली असल्याने त्याबाबत आमचे अशिल लागलीच योग्य ती कायदेशीर कोर्ट कारवाई करणार आहेत.

तरी या सावधानतेचे जाहीर नोटीसीव्दारे कळविणेत येते की, वरील मिळकतीबाबत धनंजय महादेव मुंजाळ रा. सर्वे नं. ७८/१, समर्थ नगर, तन्नु शाळेजवळ,, नवी सांगवी, पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे यांचेशी कोणतीही कसलाही खरेदीखत, साठेखत, गहाण, दान, लिज, लिन, बक्षीसपत्र, कुलमुखत्यारपत्र वगैरे तत्सम स्वरूपाचे जमीन हस्तांतरणाचे व्यवहार करू नयेत. जर तसा व्यवहार झालेस आमचे अशिलाचे हक्कावरती बंधनकारक राहणार नाही. कोणाची फसगत होवु नये म्हणुन ही सावधानतेची ' जाहीर नोटीस दिली असे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
तारीख २०/०१/२०२५

**श्री. गणेश भगवान सावंत**
B.S.L.,LL.B. **ॲडव्होकेट**
रा. अरण, ता. माढा जि. सोलापूर
मो.नं. ९९२२६२६६२२
अशिला तर्फे डव्होकेट

# लष्करशाहीचा अवलंब केल्यामुळे पाकिस्तानला स्वतःचे अस्तित्व गमवले

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- भारत आणि पाकिस्तानची निर्मिती एकाच वेळी झाली. परंतु, गेल्या पंचाहत्तर वर्षामध्ये भारताने संविधानाच्या मागार्ने लोकशाही देश म्हणून प्रगती केली.

लष्करशाहीचा अवलंब केल्यामुळे पाकिस्तानला स्वतःचे अस्तित्व गमवावे लागले. पाकिस्तान हा समृद्ध वारसा असणारा प्रांत असला तरी आयडियॉलॉजीमध्ये फसलेला देश आहे, असे विचार

महाराष्ट्र टाईम्स पुणे आवृत्तीचे निवासी संपादक व संगमेश्वर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्रीधर लोणी यांनी मांडले. संगमेश्वर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग आणि माजी विद्यार्थी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात लोणी बोलत होते. या

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा हे होते.याप्रसंगी श्रीधर लोणी लिखित 'पाकिस्तान का मतलब क्या ?"श्रीधर लोणी यांनी साधला



'संगमेश्वर' मध्ये विद्यार्थ्यांशी संवाद या नुकत्याच प्रकाशित झालेल्या ग्रंथाच्या निमित्ताने लेखक वाचक उपक्रमांतर्गत त्यांनी विद्यार्थ्यांशी संवादही साधला.त्या लोणी म्हणाले, पाकिस्तानच्या निर्मितीमागील दृष्टिकोन देशातील लेखकांच्या पुस्तकातून आणि संरक्षणविषयक पत्रकारिता करताना जाणून घेता आला. धर्मावर आधारित देश आणि भारत विरोध यामध्येच स्वतःचे अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न पाकिस्तानने केला. पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली तरी पाकिस्तानला आपल्या कॉलेजच्या आठवणीही जागवल्या श्रीधर लोणी यांनी आपल्या भाषणात सोलापूर व संगमेश्वर कॉलेजमधील जुन्या आठवणींना उजाळा दिला. सोलापूर हे बहुभाषिक शहर असून महाराष्ट्रातील मुंबई शहरानंतर एवढी भाषिक विविधता सोलापूरमध्येच पाहावयास मिळते. संगमेश्वर महाविद्यालयांतून माझी वैचारिक जडणघडण झाली. पस्तीस वर्षानंतर आज कॉलेजमध्ये येण्याची संधी मिळाली. कॉलेजने केलेली प्रगती आणि उच्च शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान अभिमानास्पद असल्याचे गौरवोद्गार माजी विद्यार्थी श्रीधर लोणी यांनी काढले. अस्तित्वाचा प्रश्न सोडविता आलेला नाही. उत्तरासाठी धमार्चा-इस्लामचा आधार घेतला जातो.

मात्र,तो मुद्दा योग्य नसल्याने भारत विरोध हाच मुद्दा पुढे केला गेला.पाकिस्तान हा कोणत्याही साधारण देशासारखा वाटचाल करत नाही.अल्लाह, आर्मी आणि अमेरिका या 'तीन ए' भोवती पाकिस्तानची अस्मिता फिरत असते. देशात लष्कराचे वर्चस्व निर्माण झाले आणि दुसरीकडे मूलतत्त्ववाद वाढत गेला. तेथे राजकीय संस्था विकसित होऊ शकल्या नाहीत.

यातून पाकिस्तान आर्थिक दिवाळखोरीच्या दिशेने गेला.भारत विरोध हा मुद्दा सोडला तर भारतापासून वेगळे का झालो याचे उत्तर देता येणार नाही असा पेच पाकिस्तानपुढे आहे.

अस्मितेच्या गोंधळात पाकिस्तान चक्रव्यूहात अडकत गेला, त्याचे विश्लेषण पुस्तकात असल्याचे श्रीधर लोणी यांनी सांगितले. प्रास्ताविक माजी विद्यार्थी समितीचे समन्वयक प्रा. विष्णू विटेकर यांनी केले. त्यांनी संगमेश्वर कॉलेजमधील माजी विद्यार्थ्यांच्या समृद्ध परंपरेचा आढावा घेतला. अध्यक्ष प्रभारी प्राचार्य ऋतुराज बुवा यांनी लोणी यांचे पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य विशद केले.

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**
**ई-निविदा सुचना क्रमांक ३४ सन २०२४-२५ (ऑनलाईन)**
**(दुबार निविदा सूचना)**

संदर्भः- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२/मंत्रालय मुंबई-०३ दि. २७/०९/२०१८

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापुर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत व सा.बां. विभागाकडून नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदार यांचेकडून खालील कामा करिता ''बी-१'' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर, ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. २०/०१/२०२५ (वेळ सकाळी १०.०० वाजेपासून) ते दि. २९/०१/२०२५ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | ---निरंक--- |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक. | दि. २९/०१/२०२५ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| मूळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा शर्त ८.१) | ई-नविदा पोर्टलवर बीड लॉक झाल्यानंतर ७२ तासात हार्ड कॉपी १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. १. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ | दि. ३१/०१/२०२५ मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.gov.in 2) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००६ कार्यालयात सुचना फलक

**सही/- (मनोज रा. ठाकरे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

(डीजीआयपीआर-२०२४-२५/क्र-५/सी५७६३)

# नागनाथ महाविद्यालयात कायदेविषयक प्रबोधन शिबिर

**मोहोळ शहर (कटूसत्य वृत्त) :-** ग्राहक समिती, महामार्ग पोलीस मोडनिंब व नागनाथ महाविद्यालयाच्या

संयुक्त विद्यमाने नागनाथ महाविद्यालयात कायदेविषयक प्रबोधन शिबीर घेण्यात आले.

ग्राहक समिती प्रदेश अध्यक्ष तानाजीराव गुंड हे अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थ्यांना सुरक्षाचे महत्व, नियमाचे


पालन करणे, स्वतःची



काळजी घेणे, होणारा दंड अशा अनेक विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस

अधिकारी बालाजी साळूंके, पोलीस हवालदार दादासाहेब लोंढे, प्राचार्य बी. एन. बागवान व पी. एस. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आनंदराव देशमुख बबनराव नरुटे, प्रमोद लांडे, दाजी वाघमोडे, अविनाश बाबर उपस्थित होते. सूत्रसंचालन एम. के. माळी यांनी केले. ग्राहक समितीचे जिल्हाध्यक्ष संतोष कोल्हाळ यांनी आभार मानले. के. पी. कांबळे यांनी कार्यक्रम पार पाडण्यासाठी सहकार्य केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) ख्रिश्चन लोकांचा धर्मग्रंथ २) घर (हिंदीत)३) नदीचा काठ, बाण ४) बसपाच्या अध्यक्षा ५) एक कंदमूळ ६) बदक (इंग्रजीत), कड उलट लिहा ९) आर्थिक कुवत १०) हिंदी सिनेसृष्टीतील एक ज्येष्ठ अभिनेता १२) छ. शिवरायांच्या एक पत्नी १३) सल उलट लिहा १४) पम उलट लिहा १६) एक इंग्रजी मुळाक्षर १७) द्रोणाचार्यांना अंगठा कापून देणारा धनुर्धारी शिष्य १८) शिवकालीन लढाई पध्दत-गनिमा ** २०) लायब्ररी (मराठीत) २१) मादीच्या विरूध्दार्थी शब्द २३) स्वार्थ, हव्यास २६) दहशतयुक्त वजन, दरारा २७) निवृत्त भारतीय फलंदाज- राहुल *** २९) जादू, किमया ३१) खिडकीच्या वा दरवाजाच्या फटीतून आत येणारा किंचीतसा प्रकाश ३२) कुत्र्याचा जोडीदार ३४) वस्तूचे बाह्यस्वरूप, साईज (मराठीत) ३५) मांत्रिकाने दिलेला गळ्यात बांधतात तो ३८) कवितेतील जुळून येणारी रचना, शब्दालंकार ३९) आंबा (हिंदीत) ४०) वन, अरण्य (हिंदीत) ४१) युध्दापूर्वीची सामोपचाराची बोलणी

**आडवे शब्द :** १) सुप्रिया सुळे या लोकसभा मतदारसंघाच्या खासदार आहेत ४) धैर्यशील मोहिते-पाटील खासदार असलेला लोकसभा मतदारंघ, सोलापूर जिल्ह्यातील एक तालुका ५) धनंजय मुंडे या जिल्ह्यातील आहेत ७) तूप (हिंदीत) ८) छोटे चारचाकी प्रवासी वाहन ९) लगेच, त्वरेने ११) शरीर (हिंदीत) १२) सूट, मोकळीक १४) विषमच्या विरूध्दार्थी शब्द १६) तीस आणि एक मिळून होणारी संख्या १७) समरस, मग्न, दोन भिन्न वस्तूंचे पूर्णपणे एक होणे १८) गोंधळ, धरणाच्या पाण्याचा मोठा कॅनॉल १९) एक म्हण-** नको पण कुत्रं आवर २०) उणीव, टंचाई २२) विहिरीतून पाणी खेचण्याचे चक्रयंत्र २४) एक म्हण-*** तोंडी मोठा घास २५) पाणी निघून जाण्यासाठी खोदलेला छोटा पाट २६) मनावरील दडपण २७) धन, पैसाआडका २८) संशय (हिंदीत) ३०) महाराष्ट्राची राजधानी ३१) कविता रचणारा ३२) आधार (हिंदीत) ३३) लहान बाळाला टोचतात ती ३४) एखाद्या गोष्टीचा छंद, ही असेल तर सवड मिळते ३५) कब्जा, ** घेणे ३६) कडधान्याचे वाळलेले काटक्या ३७) शालेय मुलांचा घेतला जाणारा व्यायाम प्रकार ३९) माता, जननी ४०) पाऊस (हिंदीत) ४२) एक विदेशी मद्य ४३) निवडणुकीत उमेदवाराला मत देण्याची क्रिया ४४) गजराज, सोंड असलेला मोठा प्राणी ४५) बशीचा साथीदार

## सुडोकु - 155

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | 1 | | | 4 | | | 2 |
| 6 | | 9 | 5 | | 7 | 3 | 8 | |
| | | 7 | | | | 4 | | |
| | | 6 | 3 | | 2 | | 1 | |
| 2 | 1 | | | | | | | 6 |
| 7 | | | 9 | | | 8 | 2 | 4 |
| 3 | | | 6 | | 1 | 2 | | 8 |
| 9 | 6 | | 7 | | | 1 | | 5 |
| | | 5 | 2 | | | 6 | 7 | |

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या**
स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**विकणे आहे**
सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्कः** 9881361260

**R.K कन्स्ट्रक्शन्स्**
इन्फ्रास्ट्रक्चर, इंडस्ट्रीज, अपार्टमेंट यामध्ये सर्व सल्ल्याबाबत तत्पर...



संपर्क पत्ता :- इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
Mo. 9552547272, 8788832033

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)



**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

